ARTHA ( Commercial Weekly )
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख ५ ऑगस्ट, १९५९ | अंक ३१

## विविध माहिती

**लोखंडाची निर्यात**—भिलाई व रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यांतून तयार झालेलें बिडाचें लोखंड परदेशीं निर्यात करून परदेशीय चलन मिळविण्यास प्रारंभ झाला आहे. चालू वर्षाच्या अखेरीस वरील पोलादाच्या कारखान्यांतून दररोज १,००० टन बिडाचें लोखंड तयार होऊं लागेल. त्याचप्रमाणें कांहीं विशिष्ट प्रकारचें पोलादहि ह्या कारखान्यांतून तयार होऊं लागेल.

**सयामी एंजिनिअरांचा दौरा**—सयाममधील १० एंजिनिअरांची एक तुकडी भारताचा दौरा करण्याकरितां आली आहे. हे एंजिनिअर्स आपल्या दौऱ्यांत भारतामधील निरनिराळ्या प्रकारचीं एंजिनिअरिंगचीं कामें नजरेखालून घालणार आहेत. विशेषतः पाटबंधाऱ्यांच्या कामांचा ते अभ्यास करणार आहेत.

**अन्न टिकविण्यासंबंधीं परिसंवाद**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेतकी खातयातर्फे बंगलोर येथें अन्नपदार्थ टिकविण्याच्या तंत्राविषयीं एक परिसंवाद भरविण्यांत आला आहे. अन्न टिकविण्याच्या निरनिराळ्या पद्धती व त्यांचा प्रसार ह्यासंबंधीं परिसंवादांत विचार करण्यांत येणार आहे. परिसंवादांत सकस व पोषणास अधिक उपयुक्त अशा प्रकारचे अन्नपदार्थ टिकविण्याविषयीं विशेष चर्चा होईल.

**चालक व कामगार ह्यांच्यांत करार**—होसपेट येथील इंडिआ शुगर्स अँड रिफायनरीज ह्या गिरणीचे चालक व कामगार ह्यांच्यांत दोन वर्षेपर्यंत औद्योगिक शांतता पाळण्याचा करार झाला आहे. कामगारांना कारखान्याच्या कारभारांत सहभागी करून घेण्याच्या दृष्टीनें हें पहिलें पाऊल आहे असें समजतें.

**पाकिस्तानची नवी राजधानी**—पाकिस्तानची राजधानी कराचीहून हलवून रावळपिंडीजवळ नेण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्या दृष्टीनें अगदीं जरूरीच्या अशा नौकरवर्गाची निवड करण्यांत येत आहे. कांहीं बड्या अधिकाऱ्यांना ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत रावळपिंडीला हजर होण्याचे हुकूम सुटले आहेत. ऑक्टोबरपासून पाकिस्तानचा कारभार रावळपिंडी येथून हाकण्यांत येईल.

**गांधींच्या लिखाणाचा संग्रह**—अमेरिकेंतील कोलंबिआ विद्यापीठाच्या प्रकाशन खात्यानें महात्मा गांधींच्या लिखाणांतील कांहीं वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे. लिखाणाच्या प्रसिद्धींत त्यांच्या कांहीं भाषणांचाहि समावेश करण्यांत आला असून सर्वांचा विषय मानवाच्या बंधुत्वाच्या नात्याचा आहे. संग्रह संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या सांस्कृतिक उपसंघटनेमार्फत तयार करण्यांत आला आहे.

**छोटा नागपूर विभागाचें महत्त्व**—भारत सरकारचे पोलाद व खाणमंत्री श्री. सरदार स्वरणसिंग ह्यांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, छोटा नागपूर हा विभाग भारतामधील रूहर ठरण्याची शक्यता आहे. ह्या भागांत अवजड यंत्रसामुग्रीचा एक कारखाना व ओतकामाचा कारखाना काढण्यांत येणार आहे. त्याशिवाय आणखी कांहीं छोटे उद्योगधंदेहि काढण्यांत येतील.

**अधिक सवलती पाहिजेत**—गोरखपूर विद्यापीठाचे उपकुलगुरु श्री. झा हे अमेरिकेचा दौरा करून परतले आहेत. त्यांनीं आपल्या निरीक्षणाची माहिती सांगतांना असे विचार व्यक्त केले कीं भारतामधील विद्यार्थी अमेरिकन विद्यार्थ्यांपेक्षा कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहींत. त्यांना अमेरिकन विद्यार्थ्यांइतक्या सवलती मिळाल्या तर ते बौद्धिक चमक जरूर दाखवितील.

**मुंबई राज्यांत दोन नवीं कॉलेजें**—मुंबई राज्यांत दोन नवीन कॉलेजें निघण्याचें घाटत आहे. ह्यांपैकी एक कॉलेज नागपूर येथें स्थापन करण्यांत येईल व दुसरें बडोद्यांत स्थापन करण्यांत येईल. नागपूर येथें भूगर्भ ह्या विषयाचें व बडोदा येथें हवामान विषयाचें शिक्षण देण्यांत येईल. दोन्ही कॉलेजांच्या स्थापनेसाठीं मध्यवर्ती सरकारचें सहकार्य राज्यसरकारतर्फे मागण्यांत येत आहे.

**शिसें आणि गंधकासाठी शोध**—उत्तर प्रदेश सरकारच्या खाणीखात्यानें राज्यांतील झाशी व अल्मोरा जिल्ह्यांत अनुक्रमें शिसें व गंधक ह्या खनिजांसाठी शोध चालविला आहे. दोन्ही जिल्ह्यांत एक खास भूस्तरशास्त्रज्ञ पाठविण्यांत आला आहे. ह्या धातूंच्या खनिजांचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यांत येऊन नंतर त्या बाबतींत निर्णय घेण्यांत येईल.

**साखर-कामगारांची पहाणी**—नगर जिल्ह्यांतील साखर-कामगारांच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी करण्याचें काम मुंबई सरकारनें सुरू केलें आहे. त्यांचें वेतन, त्यांचा खर्च आणि इतर संबंधित बाबी ह्यांचा समावेश पाहणींत करण्यांत आला आहे. पाहणी पुरी झाल्यावर कामगारांचें किमान वेतन ठरविण्याच्या दृष्टीनें भौगोलिक विभाग पाडण्यांत येण्याचा संभव आहे.

**इजिप्तच्या कापसाची प्रसिद्धि**—संयुक्त-अरब-प्रजासत्ताकातर्फे मुंबईत एक कापूसकेंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. आशिआंतील देशांत इजिप्तच्या कापसाची माहिती देण्याचें काम केंद्र करणार आहे. इजिप्तच्या कापसासंबंधींचे चित्रपट केंद्रातर्फे दाखविण्यांत येतील. प्रजासत्ताक कापसाची निर्यात वाढविण्यासाठी मोठी प्रचारमोहीम उघडणार आहे. त्याची सुरुवात केंद्र करील.

## चेक काढणारावरील ही जबाबदारी लक्षांत असूं द्या
### (मुंबई हायकोर्टाचा निवाडा)

२ मार्च, १९५९ रोजीं लक्ष्मीचंद दलचंद ह्यांनीं किशनचंद मेघराज ह्यांच्या नांवें ४०,००० रु. चा चेक काढला. मेघराज हे हिंदुस्थान मर्कंटाइल बँक लि. चे खातेदार होते. त्यांनीं चेकचे पाठीवर सही करून तो बँकेत भरला आणि त्या चेकची रकम वसूल होऊन खात्यांत जमा होण्याच्या आधींच, नेहमीच्या पद्धतीप्रमाणें, त्यांनीं ४०,००० रु. चा काढलेला चेक बँकेनें पास केला. दलचंद ह्यांनीं दिलेल्या चेकच्या आधारावर मेघराजनीं बँकेकडून ४०,००० रु. अशा रीतीनें घेतले. परंतु त्यानंतर दलचंदचा चेक नापास होऊन बँकेकडे परत आला. ड्रॉवरनें (म्हणजे दलचंदनें) पेमेंट स्टॉप केल्याची त्यावर नोंद होती. मेघराज त्यानंतर दिवाळखोर बनला आणि बँकेनें दलचंदवर ४०,००० रु. च्या वसुलीसाठी दावा लावला. बँक ही चेकची 'होल्डर इन् ड्यू कोर्स' आहे, मेघराजच्या त्या चेकवरील मालकी हक्कांत कांहीं कमतरता असेल असें बँकेला समजण्यास पुरेसें कारण नव्हतें आणि त्या आधारावरच त्यांनीं मेघराजला रकम दिली, असें बँकेचें म्हणणें होतें बँकेनें सादर केलेला पुरावा हायकोर्टानें मान्य केला. मेघराज त्याच्या खात्यांत जे चेक भरीत असे त्यांच्या आधारावर, चेक्सची रकम जमा होण्यापूर्वीच बँक त्यांना सतत पैसे काढूं देत असे, अशी व्यवस्था दीर्घकाळ चालू होती. दलचंदचें म्हणणें असें, कीं त्यांनीं ४०,००० चा चेक एका दलालाजवळ दिला होता आणि मेघराजची आर्थिक परिस्थिति समाधानकारक असल्याची खात्री झाल्यावरच तो चेक त्याला देण्यास सांगितलें होतें; पण दलालानें ही अट न पाळतांच तो चेक मेघराजला दिला. ह्या बाबतींत दलचंदनें आणलेला पुरावा हायकोर्टानें अमान्य केला.

मेघराजच्या चेकवरील मालकी हक्कांत दोष असल्याचें दलचंदला सिद्ध करतां आलेलें नाहीं; अशा दोषाची बँकेला जाणीव होती हेंहि सिद्ध झालेलें नाहीं. बँक ही चेकची 'होल्डर इन् ड्यू कोर्स' असल्यानें, चेकची ४०,००० रु. ची रकम दलचंदकडून वसूल करण्याचा तिला अधिकार प्राप्त होतो.

---

### हिंदी कापडतज्ज्ञांना अमेरिकन गिरण्यांत मज्जाव

'इंटर नॅशनल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशन (I.C.A.) टेक्निकल असिस्टन्स प्रोग्रॅम' नें आर्थिक साह्य देऊन सात हिंदी कापडतज्ज्ञांची जागतिक पाहणी-सफर घडवून आणली आहे पण अमेरिकेंतील कापडगिरण्या पहाण्यास त्यांना मज्जाव करण्यांत आला आहे. "परदेशीयांना गिरण्यांत आम्हीं प्रवेश देत नाहीं" असें त्यांना तेथील गिरणी-मालकांच्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनीं सांगितलें. अमेरिका व भारत हे कापडाच्या बाबतींत प्रतिस्पर्धी नाहींत; जपान व भारत ह्यांत स्पर्धा आहे. पण जपानमधील गिरण्या हिंदी तज्ज्ञांना दाखविण्यांत आल्या; त्यांत कोणतीच अडचण आली नाहीं. हिंदी कापडतज्ज्ञांचा दौरा आखतांना, अमेरिकेंतील गिरण्या पहायला मिळणार नाहींत हें लक्षांत आलें नाहीं, असें आतां सांगण्यांत येतें.

---

### आकाशवाणीवर 'पडसाद'

श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं लिहिलेल्या "पडसाद मालिके"-मधील दुसरी श्रुतिका बुधवार, दि. ५ रोजीं 'गृहिणी' मध्यें ध्वनिक्षेपित होईल; त्यानंतरची त्यांची श्रुतिका बुधवार दि. १९ रोजीं ध्वनिक्षेपित होईल.

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें

**१० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें १.**

विद्यालयाचा पुढील शिक्षण-वर्ग दि. १ ऑक्टोबर १९५९ रोजीं सुरू होईल विद्यालयांत सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, असिस्टंट को-ऑपरेटिव्ह ऑफिसर, सब-ऑडिटर, खरेदी-विक्री संघ, विविध कार्यकारी सहकारी सोसायटी व इतर मोठ्या सहकारी संस्थांचे सेक्रेटरी या दर्जाच्या नोकरवर्गांना शिक्षण दिलें जातें. विद्यालयाचा शिक्षणक्रम सहा महिने मुदतीचा आहे.

२. सहकारी सोसायटींत काम करणारे उमेदवार एस्. एस्. सी. उत्तीर्ण नसल्यास त्यांनीं सहकारी संस्थेंत कमींतकमी तीन वर्षे पगारी नोकरी केलेली असली पाहिजे आणि ते इंग्रजी १० वी, व्हर्नाक्युलर फायनल किंवा सेक्रेटरी शिक्षणवर्ग परीक्षा पास असले पाहिजेत. जागा शिल्लक असल्यास एस्. एस्. सी. पास झालेल्या विद्यार्थ्यांना खाजगी उमेदवार म्हणून प्रवेश मिळूं शकेल. तसेंच, वरीलप्रमाणें शैक्षणिक लायकी असल्यास स्त्रियांनाहि प्रवेश मिळूं शकेल.

३. प्रवेश दिलेल्या सोसायट्यांचे उमेदवारांना दरमहा रु. ४० प्रमाणें विद्यावेतन (स्टायपेंड) मिळेल व प्रात्यक्षिक शिक्षणाचे मुदतींत रु. ६० प्रवास भत्ता मिळेल. खाजगी उमेदवारांना विद्यावेतन अगर प्रवास-भत्ता कांहींहि मिळणार नाहीं. या उमेदवारांना सुमारें ७५ रु. प्रवास खर्चासाठी खर्च करावे लागतात.

(अ) सहकारी संस्थांत नोकरी करणाऱ्या उमेदवारांनीं आपल्या संस्थेच्या ठरावाच्या नकलांसह प्रवेश-अर्ज, आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा सहकारी बोर्डामार्फत आमचेकडे दि. २१ ऑगस्ट १९५९ पूर्वी पोहोंचतील अशा बेतानें पाठवावेत. या अर्जाची एक प्रत विद्यालयाकडे सोसायटीमार्फत पाठवावी. परस्पर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाहीं.

(ब) खाजगी उमेदवारांनीं आपल्या अर्जाची एक प्रत परस्पर विद्यालयाकडे पाठवावी व एक प्रत त्या त्या जिल्ह्याचे जिल्हा सहकारी बोर्डामार्फत पाठवावी. या उमेदवारांनीं अर्जासोबत प्रवेश फी पाठवूं नये.

४. विद्यालयाचे प्रवेश-अर्ज व माहितीपत्रकें यांची किंमत आठ आणे (५० नये पैसे) आहे. फॉर्म व माहितीपत्रकें विद्यालयाचे कचेरींत व जिल्हा सहकारी बोर्डाचे ऑफिसांत सुटीचे दिवसाखेरीज रोज ११-३० ते ५ व शनिवारीं सकाळीं ८-३० ते ११ या वेळांत मिळूं शकतील. अर्जाची मागणी करतेवेळीं आठ आणे रोख भरणें किंवा आठ आण्याची मनी-ऑर्डर करणें आवश्यक आहे. तिकिटें अथवा पोस्टल ऑर्डरनें पैसे पाठवूं नयेत. जिल्हा सहकारी बोर्डाचे पत्ते पुढीलप्रमाणें आहेत:—(१) पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि., १४८७ शुक्रवार पेठ, पुणें-२, (२) ठाणें जिल्हा सहकारी बोर्ड शिवाजी चौक, कल्याण, (३) कुलाबा जिल्हा सहकारी बोर्ड लि., बाजार पेठ, पेण, (४) सोलापूर जिल्हा सहकारी बोर्ड लि., द्वारा सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर.

५. पुणें, ठाणें, कुलाबा व सोलापूर या जिल्ह्यांतून येणाऱ्या उमेदवारांनाच फक्त या विद्यालयांत प्रवेश मिळूं शकेल.

डी. बी. निकम
सुपरिन्टेन्डेन्ट

# अर्थ

बुधवार, ता. ५ ऑगस्ट, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या खर्चाची तरतूद

### परदेशीय मदत आणि कृत्रिम चलन ह्यांवर मुख्य मदार

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेवर प्रथम ४,८०० कोटी रु. खर्चण्याचें ठरलें, परंतु पैशाच्या उपलब्धतेचा विचार करून ती रकम ४,५०० कोटी रु. वर उतरविण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत मध्यवर्ती व राज्य सरकारें ह्यांचा मिळून २,४६६ कोटी रुपये खर्च झाला असावा. (१९५६-५७ मध्यें ६३९ कोटी रु., १९५७-५८ मध्यें ८४६ कोटी रु. व १९५८-५९ मध्यें ९८१ कोटी रु.) १९५९-६० मधील खर्चाचा अंदाज १,१२१ कोटी रुपयांचा आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या खर्चाचा दुरुस्त अंदाज ४,५५० कोटी रु. असून ४,२२० कोटी रु. ची सोय करण्यांत आली आहे. २८० कोटी रु. ची तूट येणार हें आतांच दिसत आहे. चालू उत्पन्नांतून १,२०० कोटी रु. योजनेसाठी देतां येतील अशी अपेक्षा होती, त्यांत ४५० कोटी रुपये कमी पडत आहेत.

दुसऱ्या योजनेच्या मुदतींत करवाढीपासून १,००० कोटी मिळविण्याचा इरादा होता; म्हणजे मूळ ८५० कोटी रु. च्या लक्ष्यापेक्षा ही रकम १५० कोटी रु. नीं जास्त होती. परंतु, ह्या मार्गानें ७५० कोटी रुपयेच मिळण्याची शक्यता दिसते. अल्पबचत योजनेनें जमणाऱ्या रकमेंतहि ११६ कोटी रु. ची तूट येणार आहे. प्रॉव्हिडंट फंड व ठेवी ह्यांखालीं ३२४ कोटी रु. ची तूट अपेक्षित आहे. बाजारांत उभारावयाच्या कर्जामार्फत अपेक्षेप्रमाणें रकमा मिळत आहेत. रेल्वेजकडून मूळ अपेक्षेपेक्षा १८० कोटी रु. जास्त मिळतील आणि परदेशी मदतहि ३०० कोटी रु. नीं अधिक भरेल. पहिल्या तीन वर्षांतील रु. २४६६ कोटी रुपयांच्या खर्चापैकी चलनी नोटा छापून ८८२ कोटी रु. ची उभारणी करण्यांत आली. म्हणजे एकूण खर्चाच्या एक तृतीयांश रकम तुटीच्या अर्थव्यवस्थेनें भागविली. शेवटच्या दोन वर्षांत कृत्रिम चलनापासून २१० कोटी रु. उभारण्यांत येतील. अशा रीतीनें, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांतील खर्चापैकी ५०% पेक्षा जास्त खर्च परदेशी मदत अणि कृत्रिम चलन ह्या मार्गें भागविण्यांत आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ह्या दोन मार्गांनीं मिळून ३१% खर्चाची तरतूद केली होती.

### तरतुदीचे आंकडे
( कोटी रुपये )

| | मूळ अंदाज १ | पहिलीं तीन वर्षें २ | उरलेलीं दोन वर्षें (अंदाज) ३ | पांच वर्षांची बेरीज (२+३) ४ |
|---|---|---|---|---|
| योजनेचा नियोजित खर्च | ४,८०० | २,४६६ | १,७५४ | ४,२२० |
| १. चालू उत्पन्नांतून वाढावा | १,२००(a) (२५) | ४२८ (१७) | ३२२ (१८) | ७५० (१८) |
| २. जनतेकडून कर्जें | | | | |
| (i) बाजारांतील उभारणी | ७०० (१५) | ४४१ (१८) | २७७ (१६) | ७१८ (१७) |
| (ii) अल्प बचत | ५०० (१०) | २११ (९) | १७३ (१०) | ३८४ (९) |
| ३. बजेटांतील इतर मार्ग | | | | |
| (i) रेल्वेजकडून | १५० (३) | १२६ (५) | १२४ (७) | २५० (६) |
| (ii) प्राव्हिडंट फंड व ठेवी | २५० (५) | —८० | ६ | —७४ |
| ४. बाहेरून मदत | ८०० (१७) | ४५८ (१८) | ६४२ (३७) | १,१०० (२६) |
| ५. तुटीची अर्थव्यवस्था | १,२०० (२५) | ८८२ (३६) | २१० (१२) | १,०९२ (२६) |

सूचना:—कंसांतील आंकडे नियोजित खर्चाशीं ०% प्रमाण दर्शवितात.

---

### बँकांचे ठेवीचे दर कमी होणार ?

बँकांकडील ठेवींत वाढ झाली असून त्यांचा किफायतशीर उपयोग करणें त्यांना कठीण जात आहे. त्या कारणानें, ठेवींवरील व्याजाचा दर ह्यापुढें परवडणार नाहीं, अशी परिस्थिति निर्माण होत आहे. ठेवींवरील व्याजाचे दर कमी झाले म्हणजे व्याजापायीं त्यांना द्यावी लागणारी रकम कमी होईल. इंडियन बँक्स असोसिएशननें आपल्या सभासद बँकांना पत्र पाठवून त्यांचें मत विचारलें आहे. ३ ऑगस्टपर्यंत बँकांनीं आपलीं मतें कळवावयाचीं आहेत. बहुतेक बँका दर उतरवण्यास संमति देतील आणि १५ ऑगस्टपासून व्याजाचे नवे दर अंमलांत येतील अशी अपेक्षा आहे.

---

### अमेरिकेच्या विकासकर्जनिधींतून भारताला आणखी ९.५ कोटी रुपयांचें कर्ज

नवी दिल्ली येथें नुकत्याच झालेल्या एका करारानुसार, अमेरिकेच्या विकासकर्जनिधींतून भारताला आणखी २ कोटी डॉलर्सचें (९.५ कोटी रुपये) कर्ज मिळालें आहे. हें कर्ज पंधरा वर्षांत फेडावयाचें आहे. हें कर्ज मिळाल्यामुळें आतां भारताला लाईट स्ट्रक्चरल स्टील, लाईट रेल्स, प्लेट्स, वायर्स, ब्लॅकशीट्स, स्ट्रिप्स, टूल, स्पेशल स्टील आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील औद्योगिक योजनांसाठी लागणारें इतर प्रकारचें पोलादी आणि इतर सामान मिळवितां येईल. हें कर्ज रुपयांत फेडावयाचें असल्यानें भारताच्या परकीय हुंडणावळीवर त्याचा बोजा पडणार नाहीं हें सदर कर्जाचें ठळक वैशिष्ट्य आहे. दोन कोटी डॉलर्सच्या ह्या कर्जामुळें जून, १९५८ पासून अमेरिकेच्या विकास कर्जनिधींतून भारताला आतांपर्यंत मिळालेल्या कर्जाची एकूण रकम आतां १९.५ कोटी डॉलर्सवर (९२.६ कोटी रुपयांवर) गेली आहे.

## गेल्या तीन वर्षांत २,९०० वर नव्या कंपन्या

भारतांत ३१ मार्च १९५९ रोजीं संपलेल्या तीन वर्षांत एकूण ५९८ कोटी रुपये अधिकृत भांडवलाच्या २,९०४ नव्या कंपन्या स्थापन झाल्या. या नव्या कंपन्यांपैकीं २०७ पब्लिक कंपन्या व २,६९७ प्रायव्हेट कंपन्या होत्या. त्यांचें एकूण अधिकृत भांडवल अनुक्रमें १६६ कोटी रु. व ४३२ कोटी रु. आहे. या एकूण नव्या कंपन्यांपैकीं सुमारें एकतृतीयांश, म्हणजे १,०२४ कंपन्या पश्चिम बंगालमध्यें आणि मुंबई राज्यांत एक पंचमांश म्हणजे ६०१ कंपन्या स्थापन झाल्या.

सदर नव्या कंपन्यांपैकीं १२५९ कंपन्या औद्योगिक व उत्पादक स्वरूपाचा व्यवहार सुरू करण्यासाठीं, ८७५ व्यापार व आर्थिक उलाढालीसाठीं, आणि ६० कंपन्या खाणकामाचा धंदा करण्यासाठीं स्थापन झाल्या.

### लहान व मोठ्या कंपन्या

नव्या कंपन्यांत लहान प्रमाणावरील कंपन्या सुमारें ६१ टक्के म्हणजे १,७७७ असून त्यांचें प्रत्येकीं अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपयांहून जास्त नव्हतें. मोठ्या म्हणजे प्रत्येकीं ५० लक्ष रुपयांवर व एक कोटी रुपयांपर्यंत अधिकृत भांडवलाच्या ४३ कंपन्या असून १ कोटी रुपयांवर अधिकृत भांडवलाच्या ७८ मोठ्या कंपन्या आहेत. या ७८ फार मोठ्या कंपन्यांपैकीं १५ सरकारी असून त्यांचें एकूण अधिकृत भांडवल २२५ कोटी रु. आहे. बाकीच्या ६३ खासगी प्रवर्तकांनीं व उद्योगपतींनीं काढलेल्या असून त्यांचें अधिकृत भांडवल २५१ कोटी रु. आहे.

### मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचा कमी अवलंब

सदर तीन वर्षांत स्थापन झालेल्या या २,९०४ कंपन्यांपैकीं २,१८१ कंपन्यांचा कारभार प्रत्यक्ष डायरेक्टर बोर्डाकडून पाहण्यांत येणार असून अवघ्या ३६ कंपन्या मॅनेजिंग एजन्सी-तर्फे आपला व्यवहार पाहणार आहेत. मॅनेजिंग डायरेक्टरांतर्फे कारभार पाहूं इच्छिणाऱ्या कंपन्यांची संख्या ६७४ आहे. यावरून आतां मॅनेजिंग एजन्सी पद्धतीऐवजीं खुद्द डायरेक्टर बोर्डानें कारभार पाहण्याकडे काटा स्पष्टपणें झुकलेला आहे असें म्हणतां येईल.

### एकूण कंपन्या

३१ मार्च, १९५९ रोजीं या देशांत अंदाजें एकूण २७,४७९ कंपन्या चालू असाव्यात व त्यांचें वसूल भांडवल एकूण सुमारें १,५१७ कोटी रुपये असावें. तीन वर्षांपूर्वी नवा कंपनी कायदा जारी झाला तेव्हांचे हेच आंकडे अनुक्रमें २९,८७४ कंपन्या व १,०२४ कोटी रुपये असे होते.

### वसूल भांडवल

या तीन वर्षांत कंपन्यांच्या संख्येंत घट झाली. म्हणजे देशांतील या क्षेत्रांतील कार्य मंदावलें असा अर्थ होत नाहीं. कारण ही संख्या घटली असतांहि नवा कायदा अंमलांत आल्यापासून गेल्या कांहीं वर्षांत कंपन्यांच्या वसूल भांडवलांत सतत वाढ होत असल्याचें दिसून येतें.

गेल्या तीन वर्षांत व्यवहार थांबविलेल्या कंपन्यांचें बुडालेलें वसूल भांडवल लक्षांत घेऊनहि चालू कंपन्यांच्या वसूल भांडवलांत निव्वळ ४९२ कोटी रुपयांची वाढ झाली.

प्रत्यक्षांत काम थांबविलेल्या कंपन्यांचीं नांवें कंपनी कायदा कारभार यंत्रणेच्या रजिस्टरावरून काढून टाकल्यानें ही संख्या घटलेली आहे.

## अमेरिकन नियतकालिकांची कम्युनिझमविरोधी आघाडी

अमेरिकेंत निघणाऱ्या लाइफ, टाइम इंटरनॅशनल, ह्या नियतकालिकांच्या चालकांनीं अविकसित देशांतील रोगराई व कम्युनिझम ह्यांच्या प्रसाराला आळा घालण्यासाठीं एक योजना तयार केली आहे. ह्या योजनेंत अमेरिकन बोटींच्या एका काफिल्याचा उपयोग करण्यांत येणार आहे. ५० वर्षांपूर्वी अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष मि. थिओडोर रूझवेल्ट ह्यांनीं अमेरिकन जहाजांचा एक काफिला सर्व जगभर पाठविला होता. अमेरिकेची भरभराट आणि तिची शक्ति ह्यांचा प्रभाव जगांतील देशांवर पाडावा म्हणून त्यांनीं हा उपक्रम केला होता. पण त्या उपक्रमांत आणि सध्याच्या योजनेंत महत्त्वाचा फरक आहे. आतां जो काफिला पाठविण्याचें घाटत आहे, त्यामधील बोटींवर तोफा, बंदुका असणार नाहींत; पण अन्नपदार्थ, औषधें आणि तंत्रज्ञ हीं मात्र असतील. जगांत ज्या ठिकाणीं कांहीं नैसर्गिक उत्पात झाला असेल त्या ठिकाणीं ह्या साऱ्यांतून जरूर तें साह्य तावडतोब पोचविण्यांत यावयाचें आहे. भूकंप, रोगाची सांथ, जलप्रलय, अशा आपत्तींनीं गांजलेल्या लोकांना साह्य करण्यासाठीं वरील काफिला सर्व जगभर फिरता ठेवण्यांत यावयाचा आहे. ह्या काफिल्यांत एक इस्पितळाचें जहाज व एक विमानवाहक बोट असेल. काफिल्यांत सहा–सात बोटी असतील. योजनेच्या चालकांची अशी अपेक्षा आहे कीं, अमेरिकन सरकार त्यांना बोटी पुरविण्याच्या कामीं साह्य करील. अमेरिकन आरमाराचीं कांहीं जहाजें सध्या घासून पुसून बाजूलाच ठेवण्यांत आलेलीं आहेत. अमेरिकेंत अन्नपदार्थहि भरपूर प्रमाणांत शिल्लक आहेत. काफिल्याचा हा जगप्रवास १८ महिने चालू ठेवण्याचा विचार आहे. योजनेसाठीं लागणारी २ ते ३ कोटी डॉलर्सची रक्कम खाजगी प्रयत्नानें उभारतां येईल असा चालकांचा विश्वास आहे.

---

## खाजगी मालकीच्या भांडवलाला वाव पाहिजे

हिंदमधील संमिश्र अर्थव्यवस्थेंत खाजगी मालकीच्या भांडवलाला संधि देण्यांत आली पाहिजे, अशी मागणी उद्योगपती करीत असतात. मुंबई येथील 'फोरम फॉर फ्री एंटरप्राइझ' ही संस्था खाजगी उद्योगधंद्यांची बाजू समजावून देण्यासाठीं स्थापन करण्यांत आलेली आहे. ह्या संस्थेतर्फे 'खाजगी उद्योगधंद्यांची कामगिरी' ह्या विषयावर व्याख्यानमाला गुंफण्यांत येत आहे. जलवाहतुकीच्या धंद्यांतील खाजगी कंपन्यांच्या कार्याविषयीं प्रसिद्ध उद्योगपति श्री. एम. ए. मास्टर ह्यांनीं ह्या व्याख्यानमाले-पैकीं एक व्याख्यान दिलें. जलवाहतुकीच्या धंद्यांत खाजगी कंपन्यांना किती कष्ट व धडपड करावी लागली त्याचा इतिहास निवेदन करून श्री. मास्टर ह्यांनीं देशाच्या औद्योगिक विकासांत खाजगी भांडवलाला अधिक वाव देण्याची विनंती सरकारला केली. ते म्हणाले कीं, 'पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरी-पर्यंत हिंदी जलवाहतुकीच्या धंद्यांत ५ लाख टन वजनाच्या नव्या बोटी आणण्यांत आल्या. त्यांपैकीं ४॥ लाख टन वजनाच्या बोटी खाजगी मालकीच्या कंपन्यांनीं आणल्या. उरलेल्या अर्ध्या लाख टनाच्या बोटीच काय त्या स्टेट कॉर्पोरेशनमार्फत पैदा करण्यांत आल्या. भारतीय मालकीच्या बोटवाहतूक कंपन्यांच्या बोटींत मालाची वाहतूक करण्यासाठीं जी जागा असते तिचा संपूर्ण फायदा भारत सरकार अद्यापींहि घेत नाहीं. सरकारतर्फे जी वाहतूक करण्यांत येते त्यासाठीं पुष्कळदां परदेशी बोटींचा वापर करण्यांत येत असतो. अर्थात् त्यामुळें थोड्याफार प्रमाणांत परदेशीय चलन निष्कारण खर्च होतें.

## यंत्रमाग वरदान कीं शाप ?

### एक्साईज ड्यूटीचा परिणाम

विणकऱ्यांना सुखी करण्याकरितां, त्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगति करण्याकरितां सरकार अनंत मार्गानें अहर्निश प्रयत्न करीत आहे.

कोट्यवधि रुपयांचा रिबेट सहकारी सोसायटींना देऊन आजपर्यंत दारिद्र्य आणि उपासमार यांनीं पीडलेल्या विणकरांना सुखासमाधानानें जगवून ते स्वावलंबी कसे बनतील याबद्दलचा महान् खटाटोप सरकारकडून झालेला आहे व अद्यापहि चालू आहे.

या सर्वांचा उच्चांक गाठण्याकरितां हातमागाचें यंत्रमागांत रूपांतर करण्याचा प्रयोग केंद्रीय सरकारनें हातीं घेतला आहे. फार मोठ्या प्रमाणांत पैसा आणि धोका पत्करून जिल्ह्यांतून ३०,००० पेक्षा वस्ती नसलेल्या गांवांतून सहकारी सोसायट्यांच्या मार्फत प्रत्येकीं पंधरा यंत्रमाग चालविण्यास सरकारनें दिले आहेत.

आमच्या भिंगार गांवाला दोन सोसायट्यांना मिळून चाळीस यंत्रमाग आलेले आहेत आणि ते अत्यंत चांगल्या रीतीनें चालूहि झालेले आहेत. सरकारची ही योजना शंभर टक्के यशस्वी कशी करितां येईल याचें प्रात्यक्षिक पहावयाचें असल्यास आमच्या गांवाकडे बोट दाखवितां येईल.

परंतु आमचा सर्व प्रयत्न, सर्व उत्साह नाहींसा करून आम्हांला किंकर्तव्यमूढ बनविणारें एक अद्‌भुत प्रकरण निर्माण झालें. ज्याची आम्हांला स्वप्नांतहि कल्पना नव्हती असें महान् संकटच आमच्यापुढें एक्साईज ड्यूटीच्या रूपानें उभें राहून त्यानें आम्हांला नेस्तनाबूद करण्याची वेळ आणली आहे. नाइलाजानें यंत्रमाग बंद करून सरकारची ही महान् योजना आम्हीं स्वीकारूं शकत नाहीं असें म्हणण्याची पाळी आलेली आहे.

चोराला सोडून संन्याशी फांशी कसा जातो ह्याचें उदाहरण आमचे बाबतींत दिसून येईल. धनिकांनीं यांत भाग घेऊं नये, ते घेतील तर संपत्तीच्या जोरावर मोठ्या प्रमाणांत यंत्रमाग सुरू करतील व गरीब विणकरांना धोका निर्माण होईल या सद्हेतूनें फॅक्टरीला एक्साईज शेड बसविली गेली. परंतु हे लुच्चे लोक चार चार मागांचा गट बनवून आणि तो वेगवेगळ्या माणसाच्या नांवावर करून राजरोस एका ड्यूटीमध्यें यंत्रमाग चालविण्याचा गुन्हा करतात आणि शिवाय या एक्साईज ड्यूटींतून मुक्त आहेत. आमचा गरीब विणकर मात्र त्या सांपळ्यांत अडकला. आमचे यंत्रमाग शेडमध्यें नाहींत ते झोपडी-झोपडींतून आहेत. सरकारनें प्रत्येकाला स्वतंत्र माग स्वतंत्र कर्ज दिलें आहे. ही एवढी मोठी रक्कम विणकरांच्या ताब्यांत देतांना त्या गरीब विणकरांकडून सरकार काय तारण घेणार? सरकारचे पैसे सुरक्षित राहून त्याची योग्य फेड विणकरांकडून व्हावी येवढ्याच उद्देशानें सोसायट्यांच्या मार्फत ते चालविले जावेत अशी सरकारची योजना असावी. परंतु यामुळें सोसायटी फॅक्टरी ठरली.

एकहि माग सोसायटीच्या मालकीचा नाहीं. एका घरांत दोन मागापेक्षा जास्त माग चालू नाहींत. एक्साईजच्या कचाट्यांत सांपडण्यासारखी कसलीहि गोष्ट या ठिकाणीं घडलेली नाहीं.

रोजची भ्रांत असणारा विणकर यंत्रमाग स्वतःच्या जबाबदारीवर कसा चालवूं शकेल? गरिबांस हत्ती दान दिल्यासारखेंच तें हास्यास्पद आहे. म्हणून केवळ सहकारी सोसायटीमार्फत त्यांना सूत पुरवावें आणि त्यांच्या पक्क्या मालाची विक्रीहि करून द्यावी अशी सरकारची योजना आहे. ही विणकराची सेवा आहे. त्यांची यंत्रमागांवर मालकी नाहीं.

गेल्या आठ महिन्यांपासून यंत्रमाग बसविण्याकरितां विणकरांचे हातमाग बंद ठेवावे लागले. कारण एक तर जेमतेम एक माग बसेल एवढीच जागा त्याच्या घरांत असते आणि दुसरें म्हणजे हातमाग विभागाकडे त्याचें उत्पादन घेतां येत नसतें. अशा कारणानें गेल्या दहा महिन्यांपासून या चाळीस विणकरांना कोठल्याहि तऱ्हेचें काम राहिलें नाहीं आणि त्याच्यावर उपासमारीची पाळी आली आहे.

गेल्या दोनतीन महिन्यांपासून कांहीं यंत्रमाग सुरू झाले आहेत. कांहीं आतां नुकतेंच सुरू होत आहेत. इतके दिवस हालअपेष्टा सोसल्यानंतर आतां कुठें त्यांना दोन घास सुखाचे मिळू लागले आहेत. भाग्योदयाचें मनोहर स्वप्न तो नुकताच पाहूं लागला आहे. तोंच त्यांचे यंत्रमाग बंद ठेवण्याचें कटु कर्तव्य बजावण्याचें आमच्या नशिबीं आलें आहे. जूनच्या एक तारखेलाच बरेच माग आम्हांला बंद करावे लागले. घरांतील आप्त वारल्याइतकें दुःख त्यांना झालें. त्यांची केविलवाणी स्थिति आणि पुढें आणखी होणारे हाल पाहवत नाहींत. घरांतून यंत्रमाग काढून टाकल्याशिवाय ते हातमागहि चालवूं शकत नाहींत.

एक्साईज ड्यूटी माफ व्हावी म्हणून आमचे सहकारी अधिकारी प्रयत्न करीत आहेत. त्याचे हातांत ही गोष्ट नाहीं. हें प्रकरण त्यांनीं दिल्लीला पाठवून दिलें आहे. कोणास ठाऊक किती महिने आम्हांस वाट पहावी लागणार आहे तें? सरकार तांतडीनें या गोष्टीकडे लक्ष पुरवील तरच आमचें काम लवकर होण्याची शक्यता आहे.

वीस यंत्रमागांकरितां सरकारकडून २०,००० रुपये खेळतें भांडवल मिळालें आहे. गेल्या तीन महिन्यांत हें भांडवल संपून गेलें आहे. तयार झालेला पक्का माल म्हणजे कापड एक्साईजच्या परमिटशिवाय विकतां येत नाहीं. मे. असिस्टंट रजिस्ट्रार सी. पुणें यांचेकडून वेळोवेळीं येणाऱ्या सूचनांवरून आम्ही यंत्रमाग सुरू केले होते. टॅक्स माफीकरितां आमचे प्रयत्न चालू आहेत, एक्साईज ड्यूटी माफ व्हावी म्हणून आम्ही प्रयत्न करीत आहोंत, अशा आशयाचीं पत्रें येत असत. अलीकडे तर एक्साईज ड्यूटी माफ करण्याचा प्रयत्न चालू आहे असें आम्हांला कळविण्यांत आलें.

मे. असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब पुणें यांच्या सूचनेवरून एक्साईजनें ऑफिसच्या परवानगीशिवाय माग चालू केले म्हणून उत्पादित मालावर सुमारें १५,००० रु. एक्साईज ड्यूटी बसणार आहे. अशा तऱ्हेनें सरकारकडून आलेल्या २०,००० रु. पैकीं १५००० रु. एक्साईज ड्यूटी भरून मग त्या यंत्राच्या लोखंडाकडे कां नुसतें पहात रहावयाचें?

गेल्या पंधरा दिवसांपासून विणकरांना द्यावयास संस्थेजवळ पैसा शिल्लक नाहीं. कांहीं विणकरांनीं आपल्या घरांतील भांडीं देखील मोडलीं. अशा परिस्थितींत एवढी मोठी रक्कम भरतां येणें कशी शक्य आहे? सरकार या गोष्टीकडे लक्ष पुरवील व तांतडीनें या प्रश्नाचा निकाल लावून आम्हांला एक्साईज ड्यूटींतून मुक्त करील तरच आमचा तरणोपाय आहे. ही योजना म्हणजे सरकारचें अपत्य आहे. तरी या गोष्टीकडे वेळीं लक्ष पुरवून आम्हांला एक्साईज ड्यूटीमधून त्वरित मुक्त करावें ही विनंती.

—आझादहिन्द, अहमदनगर

### तांत्रिक शिक्षणासाठी कॅनडाचें सहकार्य

भारताच्या आर्थिक विकासासाठी परदेशी भांडवलाची जशी गरज आहे त्याचप्रमाणें तांत्रिक शिक्षण घेऊन तयार झालेल्या कुशल कामगारांची व तंत्रज्ञांचीहि आहे. अमेरिका, रशिआ, पश्चिम जर्मनी, इत्यादि पुढारलेले देश ह्या बाबतींत भारताला मदत करीत आहेत. त्याचप्रमाणें, कोलंबो योजनेला अनुसरून कॅनडाहि मदत करीत आहे. कॉमनवेल्थ एज्युकेशन कॉन्फरन्ससाठी ब्रिटनमध्यें गेलेले भारतीय प्रतिनिधिमंडळ आणि कॅनडाचें प्रतिनिधिमंडळ ह्यांच्यांत तांत्रिक शिक्षणसाठी कॅनडातर्फे देण्यांत यावयाच्या मदतीबद्दल एक करार नुकताच करण्यांत आला आहे. कॅनडानें भारताला मदतीदाखल जो गहूं पुरविला त्याची विक्री करून उभ्या राहिलेल्या पैशांतून तांत्रिक शिक्षणाच्या प्रसाराला मदत करण्यांत येणार आहे. गव्हाची विक्री करून सुमारें २७ लाख, ५०,हजार कॅनेडिअन डॉलर्स अथवा ५ कोटी रुपये जमलेले आहेत. ह्या रकमेचा उपयोग करून भारतांत उच्च प्रकारचें तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था आणि विविध व्यवसायांचें तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन करण्यांत यावयाच्या आहेत. शिक्षणप्रसाराच्या ह्या योजनेला तात्विकदृष्ट्या मान्यता मिळाली असली तरी त्यासंबंधीच्या तपशीलवार योजना अद्याप तयार व्हावयाच्या आहेत. भारतातर्फे अशा शिक्षणविषयक कार्यक्रमांचा विचार चालू आहे. भारतीय प्रतिनिधींच्या मंडळाचे पुढारी डॉ. मुदलिआर ह्यांनीं कॅनडानें देऊं केलेली मदत कृतज्ञतापूर्वक स्वीकारली आहे.

---

### छोट्या मोटारगाड्या तयार करण्यास मदत

हिंदसारख्या गरीब देशांत राहणीचें मान कमालीचें खालच्या पातळीवर असल्यानें मोटारगाड्या ठेवून त्यांचा उपभोग घेणाऱ्यांची संख्या अत्यल्पच आहे. पण राहणीचें मान वाढत गेल्यास व औद्योगिक विकासामुळें बरी प्राप्ति असलेला वर्ग अधिक प्रमाणांत निर्माण झाल्यास मोटारगाड्यांची मागणीहि जोरास लागणें शक्य आहे. तरीसुद्धां भारी किंमतीच्या गाड्या वापरणें फारच थोड्या लोकांना परवडेल. कमी किंमतीच्या छोट्या गाड्या भारतांतच निर्माण करण्यांत आल्या तर त्यांना चांगली बाजारपेठ मिळण्याची मात्र शक्यता आहे. ह्या दृष्टीनें झेकोस्लोव्हाकिआनें देऊं केलेली मदत मोलाची ठरणार आहे. भारतांत छोट्या मोटारगाड्यांच्या उत्पादनाबाबत सहकार्य करण्याची तयारी झेकोस्लोव्हाकिआनें दाखविली आहे. मोटारगाड्या तयार करण्याच्या कारखान्यासंबंधीचा तपशीवार अहवाल झेकोस्लोव्हाकिआंतील स्कोडा कंपनी तयार करीत आहे. बहुधा एक-दोन महिन्यांत कंपनीचा अहवाल भारत सरकारकडे सादर केला जाईल. संकल्पित कारखाना जेव्हां उभारला जाईल तेव्हां तो दरसाल जास्तींत जास्त २५,००० छोट्या गाड्यांचें उत्पादन करूं शकेल. प्रत्येक गाडीची किंमत ५,००० रुपयांपासून ७,००० रुपयांपर्यंत ठेवली जाईल असा अंदाज आहे. मोटारगाड्यांप्रमाणेंच जमिनीची साफसफाई करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखानाहि झेकोस्लोव्हाकिआच्या मदतीनें काढण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री मुंबईच्या एका हिंदी कंपनीला पुरविण्यांत येणार आहे. कारखान्यांत ४५ अश्वशक्तीचे ट्रॅक्टर्स तयार करण्यांत येतील. दरसाल १,००० ट्रॅक्टर्सचें उत्पादन करण्याची सोय प्रारंभीं करण्यांत येईल. कांहीं भाग मात्र परदेशांतून आणावे लागतील. ५ वर्षांत संपूर्ण ट्रॅक्टर तयार होऊं लागेल.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. धंडुके. |

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# राष्ट्रीय धोरणांत सहकारी शेतीचा समावेश

[ सहकारी शेतीच्या कल्पनेचा उगम कसा झाला, लोकसभेनें कोणता ठराव मंजूर केला, सहकारी शेती म्हणजे काय, सहकारी शेतीची आतांच का गरज भासत आहे, आणि सहकारी शेतीच्याबाबत कोणते आक्षेप घेण्यांत येतात, ह्या प्रश्नांचीं उत्तरें खाली दिलीं आहेत. ]

### सहकारी शेतीच्या कल्पनेचा उद्भव ?

अखिल भारतीय काँग्रेसनें गेल्या जानेवारीमध्यें नागपूर येथें भरलेल्या आपल्या अधिवेशनांत एक ठराव पास केला व त्याद्वारें, सरकारनें सहकारी शेतीचें उद्दिष्ट समोर ठेऊन, शेतकऱ्यांच्या श्रम सहकार संस्था (सर्व्हिस को-ऑपरेटिव्हज्) स्थापन करण्याच्या दृष्टीनें उपाययोजना करावी असा आदेश दिला. त्यानंतर २८ मार्च १९५९ रोजीं लोकसभेनें काँग्रेसच्या नागपूर ठरावास संमति दिली. अशा प्रकारें शेतीसुधारणेच्या आपल्या राष्ट्रीय धोरणांत सहकारी शेतीचा समावेश झाला व तेव्हांपासून आपले पंतप्रधान या धोरणाचा हिरिरीनें पुरस्कार करीत आहेत. सहकारी शेती हा आज अतिशय चर्चेचा विषय झाला आहे यांत आश्चर्य नाहीं.

तथापि, सहकारी शेतीची ही कल्पना कांहीं नवीन नाहीं. मुंबई व त्याचप्रमाणें इतर राज्यांत सहकारी क्षेत्रांतील एक प्रयत्न म्हणून शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन देण्यांत येत होतें आणि देशांत अशा प्रकारच्या सहकारी शेती संस्था आजहि कार्य करीत आहेत.

### लोकसभेनें कोणता ठराव पास केला ?

डॉ. राम सुभग सिंग, एम. पी. यांनीं मांडलेला व लोकसभेनें मान्य केलेला हा ठराव पुढीलप्रमाणें होता :—

"ज्या ठिकाणीं परिस्थिति अनुकूल आहे, अशा ठिकाणीं लोकांनीं स्वेच्छेनें सहकारी पद्धतीनें शेती करावी म्हणून पुढील तीन वर्षांत देशभर श्रम सहकार संस्था स्थापन करण्याचे व सहकाराची भावना वाढीस लावण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यांत यावेत."

राज्यसरकारनें सहकारी शेती संस्था स्थापन करण्यास उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें आधींच उपाययोजना केली असून अशा संस्थांकरितां आदर्श नियमहि (बायलॉज) तयार केले आहेत. सहकारी शेतीचें स्वरूप सर्वसाधारणपणें पुढीलप्रमाणें असेल.

जवळजवळ असणाऱ्या शेतांचे मालक व कास्तकार आपली जमीन व साधनें एकत्र करून आपला एक गट स्थापन करतील. ह्या गटामध्यें सामील होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांच्या फायद्यासाठीं शेतीचीं कामें ह्या गटामार्फत करण्यांत येतील. हा गट म्हणजेच सहकारी शेती संस्था होय संस्थेच्या एकूण उत्पन्नांतून सरकारला द्यावा लागणारा शेतसारा, संस्थेच्या सभासदांचा पगार व प्रासंगिक मजुरी, व्यवस्थापकीय नोकरवर्गाचा पगार, कर्ज घेतलें असेल तर त्याचा हप्ता व त्यावरील व्याज, खतें, बीं-बियाणें इत्यादींचा व त्यासारखाच इतर खर्च वजा करण्यांत येईल. संस्थेच्या सभासदांना त्यांनीं संस्थेच्या सुपूर्द केलेल्या जमिनीचा खंड रोख अथवा शेतमालाच्या स्वरूपांत देण्यांत येईल. एकूण उत्पन्नांतून हा विविध खर्च वजा केल्यानंतर राहिलेली रक्कम संस्थेला झालेला निव्वळ नफा समजण्यांत येईल व तो सर्व सदस्यांना प्रमाणशीर वाटण्यांत येईल.

आतां वरील प्रश्नाच्या दुसऱ्या भागाबद्दल सांगावयाचें म्हणजे श्रम सहकार संस्था ही शेतकऱ्यांनीं स्वेच्छेनें स्थापन केलेली संस्था असून ती बीं-बियाणें, रासायनिक खतें, कीडनाशकें, कर्ज, मालाची विक्री, इत्यादि शेतकऱ्यांच्या गरजा भागविते, जमीनसंरक्षण, कन्टूर बांध व पाणीपुरवठ्याच्या सोई इत्यादि मशागतीचीं कामें करण्यासाठींहि अशा श्रम सहकार संस्था स्थापन करतां येतात.

### श्रम सहकार संस्थांना उत्तेजन

सुरुवातीला श्रम सहकार संस्था स्थापन करण्यास उत्तेजन देण्याचा विचार आहे. याचें कारण असें कीं, सहकारी शेतीस सुरुवात करण्यापूर्वी जमीनधारणाच्या कमाल मर्यादेसारखे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न समाधानकारकपणें सोडवावे लागतील. परंतु श्रम सहकार संस्थांची स्थापना तोपर्यंत लांबणीवर टाकण्यांत येऊं नये. श्रम सहकार संस्थांपासून सहकारी शेतीपर्यंत वाटचाल करण्यास जो वेळ लागेल तो सहकारी शेती संस्था स्थापन करण्याच्या दृष्टीनें उपकारक ठरेल. कारण, श्रम सहकार संस्था स्थापन केल्यानंतर सहकारी शेती संस्था आपोआप स्थापन होतील असें नसलें तरी त्यामुळें सहकारी जीवनाबद्दल शेतकऱ्यांमध्यें विश्वास निर्माण होईल व त्या योगें सहकारी शेती संस्थांच्या स्थापनेसाठीं अनुकूल असें वातावरण निर्माण होईल. सभासद शेतकऱ्यांना सुधारलेलें बियाणें व सुधारलेलीं अवजारें पुरविणें हें या संस्थांचें मुख्य काम राहील. हें सुधारलेलें बीं-बियाणें व अवजारें यांमुळें शेतकऱ्यांचें उत्पन्न वाढण्यास चांगली मदत होईल. उत्पन्नाचीं साधनें एकत्रित करून तीं संयुक्तरीत्या हाताळल्यामुळें आपला फायदाच होतो हें शेतकऱ्यांना कळून येईल. याप्रमाणें योग्य वातावरण तयार होईल व सहकारी शेतीची कल्पना मूळ धरूं शकेल.

### आतांच त्याची गरज कां भासत आहे ?

आपल्या देशांतील शेतीच्या परंपरागत पद्धतींत अनेक शतकांपासून मुळींच बदल झालेला नाहीं. परंतु आतां आपलें भवितव्य आपल्याच हातीं असल्यामुळें ही परिस्थिति अशीच चालू ठेवतां कामा नये. राष्ट्रीय उत्पन्नांतील बराचसा भाग जर आपणांस अन्नधान्याच्या तुटीपायींच खर्च करावा लागला तर देशाची विशेष प्रगति होऊं शकत नाहीं हा धडा आपण शिकलों आहोंत. म्हणून आपली पहिली गरज अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें ही आहे. लाखों लोकांच्या अन्नाची समस्या आपणांस सोडवावयाची आहे. शिवाय आपली लोकसंख्या सारखी वाढत आहे. याउलट आपल्या शेतकऱ्यांचीं शेतें लहान व तींहि अनेक ठिकाणीं विखुरलेलीं आहेत! साधनें तुटपुंजी आहेत. अशा परिस्थितींत आपला शेतकरी या आव्हानास तोंड देऊं शकेल काय हा प्रश्न आहे, आणि या प्रश्नाचें उत्तर स्पष्टपणें 'नाहीं' असेंच द्यावें लागेल. सहकारी शेती हा या प्रश्नावरील सर्वांत चांगला उपाय आहे. शेतीच्या तंत्रांत सुधारणा घडवून आणणें हा तिचा उद्देश आहे. संयुक्त शेतीमध्यें लहान लहान शेतें एकत्र आणण्यांत येतील व त्यामुळें शेतकऱ्यांना बांधबंदिस्ती, जमीन-संरक्षण, विहिरी खोदणें वगैरे तांत्रिक कामें अधिक परिणामकारकपणें करतां येतील. त्यामुळें मजुरांना फायदेशीर रोजगार मिळेल आणि आधुनिक अवजारें व यंत्रें यांच्या साहाय्यानें

मशागत करण्याच्या खर्चात कपात होईल. संयुक्त शेतीचे फायदे स्पष्ट आहेत; त्यांवर विशेष भर देण्याची जरूरी नाहीं.

### सहकारी शेतीच्या बाबतींत आक्षेप

आपण त्यांचा येथें थोडक्यांत विचार करूं. पहिला आक्षेप असा कीं, सहकारी शेतीमुळें शेतकऱ्यांचें स्वातंत्र्य नष्ट होईल. पण शेतकऱ्यांचे जमिनींवरील मालकीहक्क कायम राहणार असल्यामुळें ही भीति निराधार आहे. सहकारी शेतीच्या उपक्रमांत सामील होणें न होणें हें शेतकऱ्यांच्या सुखीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यानें स्वेच्छापूर्वक केलेलें सहकार्य हा सहकारी शेतीचा पाया आहे.

सहकारी शेती ही कालांतरानें सामुदायिक शेतीचें (सर्वाधिकारशाही राष्ट्रांतील शेतीप्रमाणें) रूप धारण करील असा एक दुसरा आक्षेप सहकारी शेतीबाबत घेण्यांत येतो. परंतु वरील प्रमाणेंच या आक्षेपांतहि कांहीं तथ्य नाहीं. शेतकऱ्याची आपल्या जमिनीवरील मालकी कायम राहणार असल्यामुळें सहकारी शेती सामुदायिक शेतीचें रूप धारण करील अशी कल्पना करणें चुकीचेंच ठरेल.

आणखी एक आक्षेप असा कीं, भारतीय जनता व्यक्तिवादी मनोवृत्तीची आहे व भारतीय शेतकऱ्यांची आपल्या मालकीच्या जमिनीवर आत्यंतिक भक्ति असते. आपण व्यक्तिवादी आहोंत हें मान्य केलें तरी, त्यामुळें आपण सहकाराला विरोध केला पाहिजे असें थोडेंच आहे? व्यक्तिगत उपक्रमशीलता नष्ट करणें हा कांहीं सहकाराचा हेतु नाहीं. उलट संयुक्त प्रयत्नांमुळें तिचा व्यवस्थितपणें विकास होतो. आपण अनेक क्षेत्रांमध्यें सहकाराचा अवलंब केला असून तो आपल्या अनेक सामाजिक व आर्थिक व्यथांवरील रामबाण उपाय समजण्यांत येतो. ज्या अनेक क्षेत्रांत सहकाराचा अवलंब करण्यांत आला त्या क्षेत्रांत व्यक्तिगत उपक्रमशीलता दडपली गेल्याचा आरोप कुणीं कधींहि केलेला नाहीं. शेतकऱ्यांच्या आपल्या जमिनीबद्दलच्या प्रेमाबद्दल सांगावयाचें, तर संयुक्त शेतीच्या उपक्रमांत जमिनीची मालकी त्याच्याकडेच राहील हें पुन्हा एकदां स्पष्ट केलें पाहिजे.

याशिवाय व्यवस्थापक, हिशेबनीस, इत्यादि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा तुटवडा व कर्जाच्या आणि माल सांठवण्याच्या सोयींचा अभाव असल्याचाहि आक्षेप घेण्यांत येतो. परंतु हा आक्षेप कारभारासंबंधींचा आहे व त्या बाबतींत योग्य ती उपाययोजना करण्यांत येईलच. या बाबतींत एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत ठेवली पाहिजे व ती ही कीं, एखाद्या राष्ट्रानें जर भवितव्याचें आवाहन स्वीकारून विशिष्ट कार्य पार पाडण्याचा ठामपणें व एकदिलानें निश्चय केला तर कितीहि मोठ्या अडचणी समोर असल्या तरी त्या दूर होतात व ध्येयाप्रत जाणारा मार्ग स्पष्टपणें दिसूं लागतो.

## औद्योगिक सहकारी संस्थांना कर्जे

### पैसा पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्थांना सरकारी साहाय्य

छोट्या आणि घरगुती उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं औद्योगिक सहकारी संस्थांना स्वतःच्या निधींतून कर्जे मंजूर करणाऱ्या पैसा पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्थांना मुंबई सरकारनें आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. पैसा पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्था, स्वतः ज्या व्याजाच्या दरानें कर्जे घेतात तो दर, आणि त्या संस्था औद्योगिक सहकारी संस्थांना ज्या दरानें कर्जे देतात तो दर, (२॥ टक्के) यांच्यामधील फरकाइतकी, मात्र जास्तींत जास्त २॥ टक्के इतकी ही आर्थिक मदत असेल. औद्योगिक सहकारी संस्थांना छोट्या आणि घरगुती उद्योगधंद्यांच्या विकासासाठी खेळतें भांडवल म्हणून उपयोगीं पडण्यासाठी पैसा पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्थांमार्फत आर्थिक साहाय्य देण्याबाबतची एक योजना सरकारनें मंजूर केली होती. पैसा पुरविणाऱ्या मध्यवर्ती संस्थांना, सदरहू योजनेखालीं औद्योगिक सहकारी संस्थांना सवलतीच्या म्हणजे दरसाल दरशेंकडा २॥ टक्के व्याजाच्या दरानें कर्जे मंजूर करतां यावीं, म्हणून त्यांना नाममात्र व्याजाच्या दरानें पैसा उपलब्ध करून देण्यांत येतो. सदरहू मध्यवर्ती संस्थांना स्वतःच्या निधींतून सहकारी संस्थांना अशाच प्रकारचीं कर्जे २॥ टक्के दरानें मंजूर करण्यास उत्तेजन मिळावें म्हणून सरकारनें त्यांना ही आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे.

---

### तीन प्रमुख बँकांचें इंटेरिम डिव्हिडंड

कंपन्यांवरील कराच्या नव्या पद्धतीचा परिणाम बँकांच्या डिव्हिडंडवर कसा झाला आहे, हें खालील सहामाही इंटेरिम डिव्हिडंडच्या आंकड्यांवरून दिसून येईल. बँकांचे नफे डिव्हिडंडवर परिणाम करण्याइतके कमी न होता डिव्हिडंड कमी झालें आहे.

इंटेरिम डिव्हिडंड (रुपये)

| | ठोक | | निव्वळ | |
|---|---|---|---|---|
| | १९५८ | १९५९ | १९५८ | १९५९ |
| सेंट्रल बँक | २·१९ | १·९० | १·५० | १·३८ |
| बँक ऑफ बरोडा | ४·३८ | ३·५० | ३·०० | २·४५ |
| बँक ऑफ इंडिया | ४·३८ | ३·०० | ३·०० | २·१० |

---

रशिआचा फुटबॉलचा संघ —अखिल भारतीय फुटबॉल फेडरेशनतर्फे रशियन फुटबॉल फेडरेशनकडे रशिअन खेळाडूंचा एक संघ भारतांत पाठविण्याबद्दल आमंत्रण पाठविण्यांत येणार आहे. रशिअन संघ बहुधा येत्या डिसेंबरमध्यें भारतांत येईल. रोम येथें भरणाऱ्या ऑलिंपिक सामन्यासाठी जाणाऱ्या हिंदी संघाला त्यामुळें चांगला सराव होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.